नि.क्र.७७ (1) फौ.कि.अर्ज.क्र.६१/२०२२

सुषमा वि. हरिश्चंद्र

**<u>अर्जदारतर्फे साक्षीदार क्र. ०२</u>**

मी देवा शपथ खरे सांगतो की:

माझे नावः सुरज पटीर,

वयः २८ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणार – रायकर पार्क, रोहा, ता. रोहा, जि. रायगड

**सरतपासणी अर्जदारतर्फे श्रीमती एम.एम. पाटील यांच्यामार्फत :**

१. मी न्यायालयीन समन्स प्रमाणे आज साक्ष देण्यासाठी आलो आहे. मी सध्या जीवन विमा निगम शाखा रोहा येथे सहा. प्रशासकीय अधिकारी म्हणुन कार्यरत आहे. मला आमच्या कंपनीने विधी संबंधी प्रकरणात सहाय करण्यासाठी प्राधिकृत केले आहे. तसे अधिकारपत्र नि.क्र.७७ अनुक्रमांक ०१ वर दाखल केले आहे. त्यावर ठाणे विभाग व्यवस्थापक (विधी) यांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.७८** देण्यात येते. सदर अधिकारपत्रासोबत जोडलेल्या सुचीमध्ये अनुक्रमांक १५ ला माझे नाव नमुद आहे. विधी विभागास सहाय करण्यासाठी काळजीपुर्वक केलेल्या अधिका–यांची ती यादी आहे. त्यावर वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक यांची सही आहे. त्यावर आमच्या रोहा येथील शाखेचा शिक्का आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर कागदपत्राची मुळप्रत सोबत आणली नसल्यामुळे अर्जदारातर्फे विधीज्ञ श्रीमती एम.एम. पाटील यांच्या तोंडी विनंतीवरुन सरतपास तहकुब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE

Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.04.16 16:36:30 +0530

स्थळ : रोहा. (एस. व्ही. खैरे)

दि. १६.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.